HSIL

moonbow
expect the unexpected

**PRESS MONITOR**

Publication : Lok Prerna
Edition : Pune
Date : February 18, 2017

# मूनबोच्या टीव्ही जाहिरातीतून भारताला स्वच्छ पाणी पिण्याचे आवाहन

पुणे : मूनबो या एचएसआयएल लिमिटेड या सॅनिटरीवेअर कंपनीच्या मुख्य ब्रॅण्डने त्यांच्या वॉटर प्युरिफायर्ससाठी अब इंडिया पियेगा अच्छा या जाहिरात कॅम्पेनचा आज शुभारंभ केला.

टीव्हीवर झळकरणारी ही जाहिरात (टीव्हीसी) विविध सामाजिक-आर्थिक गटातील मुलांना एकत्र दाखवणारी एक कथा आहे. यात विविध गटातील मुले एकत्र खेळताना आणि पाणी पिताना दिसतात. कारण, अच्छा पानी शेअर करना अच्छी आदत है. धर्म, जात, पंथ या पलिकडे जाऊन प्रत्येकाला शुद्ध पाणी पिण्याचा हक्क आहे, या मूनबोच्या उपक्रमावर या टीव्हीसीमधून भर देण्यात आला आहे.

या नव्या ब्रॅण्ड कॅम्पेनबद्दल एचएसआयएल लिमिटेडच्या कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिव्हिजन विभागाचे अध्यक्ष श्री. राकेश कौल म्हणाले, यस्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणे ही आजघडीला भारतातील एक मोठी समस्या आहे. भारतभरातील ग्राहकांना पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करून दिले जाणे, हे आमच्या ब्रॅण्डचे उद्दिष्ट आहे. या टीव्हीसीमधून आमचे हे उद्दिष्ट अगदी योग्य पद्धतीने समोर येते. ही जाहिरात १४ फेब्रुवारी २०१७ पासून प्राइम टाइममध्ये सर्व मनोरंजन वाहिन्या, निवडक हिंदी व इंग्रजी वृत्तवाहिन्या आणि सिनेमांच्या वाहिन्यांवर झळकेल.

उत्पादनामागील अब इंडिया



पियेगा अच्छा या विचाराला एका कथेत बदलताना आयुष्याचे एक सार महत्त्वाचे ठरले की मुले कोणत्याही सिमारेषा पाळत नाहीत. चांगल्या दर्जाचे पिण्याचे पाणी सर्वांना उपलब्ध व्हावे, हे ब्रँडचे उद्दिष्ट यातही प्रतित होते. या टीव्हीसीमधील कथानकातून हाच विचार समोर येतो. देशभरात सध्या एकीच्या भावनेला खतपाणी मिळत आहे. याच भावनेला अधिक चालना देण्यात आली आहे. ही साधीशी कथा एका स्वयंपाकघरात सुरू होते. एक लहान मुलगा मूनबो वॉटर प्युरिफायरमधून पाण्याची बाटली भरून घेतो आणि खेळायला जातो. मैदानावर अनेक मुलं प्रेक्षक म्हणून त्याला पाहत असल्याचे त्याला दिसते. आपली काही कौशल्ये दाखवल्यानंतर तो त्यातील एकाला खेळायला बोलावतो. थोड्याच वेळात इतर मुलेही खेळायला येतात. पाणी एकमेकांशी वाटून घ्यावे, या सुंदर विचारावर ही जाहिरात संपते. कारण, . तुमच्याकडे इतरांना देण्यासारखे काही असेल आणि ते तुम्ही इतरांसोबत वाटून घेतले तर त्यातून एकीची भावना जपली जाते.

हृतिक रोशनसोबतची ओप्पो फोनची जाहिरात, आकाश डिजिटल, नेस्ले आणि ऊर्जा मंत्रालयाची जाहिरात करणाऱ्या अमन सचदेव यांनीच या जाहिरातीचे दिग्दर्शन केले आहे. यमूनबोची जाहिरात करताना मला फारच छान वाटले. कोणतीही जाहिरात त्यातील टीम, क्लायण्ट, एजन्सी आणि प्रोडक्शन टीम जितकी चांगली असेल तितकी चांगली बनते. सामाजिक वर्गवारी/पार्श्वभूमी असल्या गोष्टींबाबत मुलांना फरक पडत नाही, असा उदात्त संदेश देणाऱ्या या जाहिरातीच्या निर्मितीसाठी हे सारे एकत्र आले होते. योग्य कास्टिंग, उत्कृष्ट परफॉर्मन्स आणि फिल्मधील भावनिक भाग यामुळे यात अपेक्षित समतोल साधला गेला आहे.

या टीव्हीसीबद्दल टीम कॉण्ट्रॅक्टनेही मत व्यक्त केले, यउत्पादनांची प्रचंड गर्दी असलेल्या या बाजारपेठेत प्रत्येक ब्रॅण्ड तंत्रज्ञानाबद्दल बोलतो. त्यांचा प्युरिफायर इतर उत्पादनांसारखाच का आहे, याचीही उचित कारणे दिली जातात. पण, यात अब इंडिया पियेगा अच्छा या एकत्रित विचाराबद्दल भाष्य आहे. वाटून घेणे चांगले असते, ही व्यापक संकल्पना यात आहे आणि मूनबो वॉटर प्युरिफायरमुळे तुम्ही इतरांसोबत शुद्ध पाणी वाटून घेता... समोरची व्यक्ती कोण आहे, हा विचार न करता.